# भूगोल : बोर्डाची प्रश्नपत्रिका (मार्च 2020)

**वेळ : 2.00 तास]** **[एकूण गुण : 40**

**नोंद :** कोव्हिड-19 मुळे ही परीक्षा घेण्यात आली नाही.

# भूगोल : बोर्डाची प्रश्नपत्रिका (नोव्हेंबर 2020)

**(आदर्श उत्तरांसह)**

**वेळ : 2.00 तास]** **[एकूण गुण : 40**

**सूचना :** *(i) सर्व प्रश्न/कृती सोडवणे आवश्यक आहे.*

*(ii) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.*

*(iii) प्रश्न क्र. 4 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या ब्राझील नकाशा-आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

*(iv) प्रश्न क्र. 6 (अ) साठी पुरवण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.*

*(v) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.*

*(vi) प्रश्नांची उत्तरे लिहिताना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलीचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.*

*(vii) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत, पेन्सिलीने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.*

*(viii) आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिसपेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.*

---

**प्र. 1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा :** **4**

(1) ब्राझील -------------- या नृत्यप्रकारासाठी प्रसिद्ध आहे.

*(i) सांबा (ii) बिहू (iii) भांगडा (iv) भरतनाट्यम्*

(2) लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा जगातील -------------- क्रमांकाचा देश आहे.

*(i) पहिल्या (ii) पाचव्या (iii) सातव्या (iv) दुसऱ्या*

(3) ॲमेझॉन ही जगातील एक मोठी नदी आहे. या नदीच्या मुखालगत --------------.

*(i) त्रिभूज प्रदेश आहे (ii) वितरिका आढळत नाहीत*

*(iii) विस्तीर्ण खाड्या आहेत (iv) मासेमारी व्यवसाय केला जातो*

(4) भारतात -------------- राज्यात लोहमार्गाचे विरळ जाळे आढळते.

*(i) उत्तर प्रदेश (ii) महाराष्ट्र (iii) तमिळनाडू (iv) राजस्थान*

**प्र. 2. वेगळा घटक ओळखा :** **4**

(1) ब्राझील प्रमुख पिके :

(i) काकाओ (ii) कॉफी (iii) सोयाबीन (iv) ज्वारी

(2) क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश :

(i) भौगोलिक (ii) ऐतिहासिक (iii) मनोरंजन (iv) सांस्कृतिक

(3) ब्राझीलमधील वन प्रकार :

(i) काटेरी झुडपे (ii) सदाहरित वने (iii) हिमालयीन वने (iv) पानझडी वने

(4) भारतातील मीठ उत्पादक राज्य :

(i) गुजरात (ii) राजस्थान (iii) बिहार (iv) तमिळनाडू

**प्र. 3. *एका वाक्यात* उत्तरे लिहा : *(कोणतेही चार)*** **4**

(1) ब्राझीलचा बहुतांश भाग कोणत्या गोलार्धात आहे?

(2) भारतातील सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य कोणते?

(3) ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर कोणते?

(4) लिंग-गुणोत्तर म्हणजे काय?

(5) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात कोणत्या स्वरूपाच्या वस्त्या आढळतात?

**प्र. 4. (अ) ब्राझीलच्या नकाशा-आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा : *(कोणतेही चार)*** **4**

(1) पँटनाल

(2) काटेरी झुडपी वने


(3) पंपास (गवताळ प्रदेश)

(4) कॉफी उत्पादक प्रदेश

(5) उत्तरेकडील नागरी लोकसंख्या असलेले राज्य (आमापा)

(6) मॅनॉस बंदर.

**प्र. 4. (आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : *(कोणतेही चार)*** **4**



**प्रश्न :**

(1) वरील नकाशा काय दर्शवतो?

(2) उत्तर-दक्षिण महामार्ग कोणत्या दोन शहरांना जोडला आहे?

(3) पूर्व किनाऱ्यावरील प्रमुख दोन बंदरांची नावे लिहा.

(4) भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील सर्वांत दक्षिणेकडील बंदर कोणते?

(5) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख बंदर.

**प्र. 5. भौगोलिक कारणे लिहा : *(कोणतीही दोन)*** **6**

(1) ब्राझीलमध्ये नियमित हिमवर्षाव होत नाही.

(2) भारताच्या पूर्व किनाऱ्यावर नैसर्गिक बंदरे कमी आहेत.

(3) ब्राझीलमध्ये लोकवस्तीचे केंद्रीकरण पूर्व किनाऱ्यालगत आढळते.

(4) ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारतात पाऊस पडतो.

**प्र. 6. (अ) पुढे दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा रेषालेख काढा व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

**भारताची ब्राझीलसोबत झालेली निर्यात**

**(निर्यात – दशलक्ष यू. एस. डॉलरमध्ये)**

| **वर्ष** | २००८ | २००९ | २०१० | २०११ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|
| **निर्यात** | ३७०० | २२०० | ४२०० | ६१०० | ५००० |

**प्रश्न :**

(1) २००८ ला भारताची निर्यात किती होती?


(2) भारताची सर्वाधिक निर्यात कोणत्या वर्षी होती?

(3) २००९ ते २०११ या कालावधीत भारताच्या निर्यातीत किती दशलक्षाने वाढ झाली?

***किंवा***

**प्र. 6. (आ) पुढे दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :** **6**

**वय आणि लिंग मनोरा (भारत 2016)**



**प्रश्न :**

(1) वरील आलेखाचे शीर्षक लिहा.

(2) सर्वाधिक लोकसंख्या कोणत्या वयोगटात आहे?

(3) 'य'-अक्षावर दिलेल्या वयोगटातील वर्गांतर लिहा.

(4) ६० पेक्षा जास्त वयोगटातील स्त्री-पुरुष यांपैकी कोणाचे प्रमाण अधिक आहे?

(5) ५५ ते ५९ या वयोगटात स्त्रियांचे प्रमाण किती टक्के आहे?

(6) कोणत्या वयोगटानंतर लोकसंख्येत घट होताना दिसते?

**प्र. 7. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : *(कोणतेही दोन)*** **8**

(1) साखर कारखान्यास भेट देण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(2) भारताच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा थोडक्यात आढावा घ्या.

(3) भारत व ब्राझीलमधील वनांचा ऱ्हास होण्याची प्रमुख कारणे कोणती?

---

# बोर्डाच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरे (नोव्हेंबर 2020)

**प्र. 1.**

(1) ब्राझील सांबा या नृत्यप्रकारासाठी प्रसिद्ध आहे.

(2) लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.

(3) ॲमेझॉन ही जगातील एक मोठी नदी आहे. या नदीच्या मुखालगत वितरिका आढळत नाहीत.

(4) भारतात राजस्थान राज्यात लोहमार्गाचे विरळ जाळे आढळते.

**प्र. 2.**

(1) वेगळा घटक : ज्वारी

(2) वेगळा घटक : मनोरंजन

(3) वेगळा घटक : काटेरी झुडपे

(4) वेगळा घटक : बिहार.

**प्र. 3.**

(1) ब्राझीलचा बहुतांश भाग दक्षिण गोलार्धात आहे.


(2) गोवा हे भारतातील सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य आहे.

(3) 'पिको दी नेब्लीना' हे ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर होय.

(4) एखाद्या प्रदेशातील दरहजारी पुरुषांच्या तुलनेत असलेली स्त्रियांची संख्या, म्हणजे 'लिंग-गुणोत्तर' होय.

(5) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात दाट व केंद्रित स्वरूपाच्या वस्त्या आढळतात.

**प्र. 4. (अ)**



**प्र. 4. (आ)**

(1) हा नकाशा भारतातील राष्ट्रीय महामार्ग व प्रमुख बंदरे दर्शवतो.

(2) उत्तर-दक्षिण महामार्ग श्रीनगर आणि कन्याकुमारी या दोन शहरांना जोडला आहे.

(3) पूर्व किनाऱ्यावरील प्रमुख दोन बंदरांची नावे : (१) कोलकाता (२) चेन्नई.

(4) कोची हे भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील सर्वांत दक्षिणेकडील बंदर होय.

(5) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख बंदर – मुंबई.

**प्र. 5.**

**(1)** (१) सर्वसाधारणपणे शीत कटिबंधातील देशांत ध्रुवीय वाऱ्यांमुळे नियमित बर्फवृष्टी होते. त्याचप्रमाणे एखाद्या देशातील समुद्रसपाटीपासून अतिउंच असणाऱ्या पर्वतीय अतिथंड प्रदेशात हिमवर्षाव होतो.

(२) ब्राझील या देशाचे स्थान शीत कटिबंधात नसून, ते उष्ण कटिबंधात आहे.

(३) याशिवाय ब्राझील देशात अतिउंच पर्वतीय प्रदेश नाहीत. त्यामुळे ब्राझीलमध्ये नियमित हिमवर्षाव होत नाही.

**(2)** (१) भारताचा पूर्व किनारा नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाच्या संचयनातून तयार झाला आहे. पूर्व किनाऱ्यावर अनेक ठिकाणी गाळाचे त्रिभूज प्रदेश आढळतात.

(२) भारताच्या पूर्व किनारपट्टीजवळ पाण्याची पातळी खूप खोल आढळत नाही. भारताच्या पश्चिम किनारपट्टीजवळ पाण्याची पातळी तुलनेने जास्त खोल आहे.

(३) गाळ व पाण्याची कमी खोल पातळी नैसर्गिक बंदरांच्या विकासास पोषक ठरत नाही. त्यामुळे भारताच्या पूर्व किनाऱ्यावर नैसर्गिक बंदरे कमी आहेत.

**(3)** (१) सुरुवातीच्या काळात युरोपमधील अनेक वसाहतवाद्यांनी ब्राझीलमध्ये लोकवस्त्या निर्माण केल्या. या वस्त्या प्रामुख्याने पूर्व किनारपट्टीच्या प्रदेशात निर्माण केल्या गेल्या.

(२) ब्राझीलमधील पूर्व किनारपट्टीच्या तुलनेने कमी रुंद पट्ट्यात सम व दमट हवामान, सुपीक जमीन, मुबलक पाणीपुरवठा व साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणावरील साठा आढळतो.


(३) परिणामी, ब्राझीलच्या पूर्व किनारपट्टीच्या प्रदेशात शेती व इतर उद्योगांचा विकास झाला आहे. परिणामी या भागात लोकवस्त्याही विकसित झालेल्या आढळतात. त्यामुळे ब्राझीलमध्ये लोकवस्तीचे केंद्रीकरण पूर्व किनाऱ्यालगत आढळते.

**(4)** (१) भारतात प्रामुख्याने नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांमुळे पाऊस पडतो. नैर्ऋत्य मोसमी वारे भारताच्या दक्षिण भागातून भारतात प्रवेश करतात व टप्प्याटप्प्याने उत्तरेकडे वाहत जातात.

(२) भारताच्या मुख्य भूमीवरून वाहणारे नैर्ऋत्य मोसमी वारे हे हिमालयाच्या शिवालिक व हिमाचल रांगांद्वारे अडवले जातात व तेथून हे वारे परत हिंदी महासागराकडे मागे फिरतात.

(३) ईशान्य दिशेकडून वाहणाऱ्या या ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारताच्या द्वीपकल्पीय भागांत पुन्हा मान्सून परतीचा पाऊस पडतो. अशा प्रकारे, ईशान्य मान्सून वाऱ्यांमुळेही भारतात पाऊस पडतो.

**प्र. 6. (अ)**




(1) २००८ ला भारताची निर्यात ३७०० (दशलक्ष यू. एस. डॉलर) इतकी होती.

(2) भारताची सर्वाधिक निर्यात २०११ या वर्षी होती.

(3) २००९ ते २०११ या कालावधीत भारताच्या निर्यातीत ३९०० दशलक्षाने वाढ झाली.

**प्र. 6. (आ)**

(1) भारत—वय आणि लिंग मनोरा.

(2) सर्वाधिक लोकसंख्या १० ते १४ या वयोगटात आहे.

(3) 'य'-अक्षावर दिलेल्या वयोगटातील वर्गांतर ४ आहे.

(4) ६० पेक्षा जास्त वयोगटात स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.

(5) ५५ ते ५९ या वयोगटात स्त्रियांचे प्रमाण २.० टक्के आहे.

(6) १० ते १४ या वयोगटानंतर लोकसंख्येत घट होताना दिसते.

**प्र. 7.**

**(1)** कारखान्यास भेट देण्यासाठी प्रश्नावली :

(१) या कारखान्याची स्थापना कोणत्या वर्षी झाली?

(२) या कारखान्यात कोणकोणत्या वस्तूंचे उत्पादन होते?

(३) या कारखान्यात कार्यरत असणाऱ्या कामगारांची एकूण संख्या किती?

(४) या कारखान्यातील वस्तूंच्या उत्पादनासाठी कोणत्या कच्च्या मालाची आवश्यकता असते?

(५) या कारखान्यातील वस्तूंच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल कोणत्या ठिकाणाहून आणला जातो?

(६) या कारखान्यात उत्पादित झालेला पक्का माल कोणत्या ठिकाणी विक्रीस पाठवला जातो?

(७) या कारखान्यातील कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कोणती खबरदारी घेतली जाते?

(८) पर्यावरणास हानी होऊ नये, यासाठी या कारखान्याकडून कोणत्या उपाययोजना केल्या जातात?

**(2)** (१) भारतात सुमारे दीड शतके ब्रिटिशांची राजवट होती.

(२) १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाले.

(३) स्वातंत्र्यप्राप्तीपासून, म्हणजेच १९४७ पासून भारतीय संघराज्याने संसदीय प्रजासत्ताक शासनप्रणालीचा अवलंब केला आहे.

(४) स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या वीस वर्षांत भारताला तीन युद्धांना व अनेक प्रांतांतील दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागले.

(५) विविध स्वरूपांच्या समस्या असूनही भारत हा जगातील एक प्रमुख विकसनशील देश आहे.

(६) भारत आज एक प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखला जातो.

(७) विविध टप्प्यांवर झालेल्या आर्थिक सुधारणांमुळे भारताच्या आर्थिक विकासास वेग आला आहे.

(८) भारतातील लोकसंख्येत कार्यशील गटातील लोकांचे (तरुणाईचे) प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे भारताकडे एक 'तरुण देश' म्हणून पाहिले जाते.

**(3)** ब्राझील व भारतातील वनांचा ऱ्हास होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :

(१) भारत व ब्राझील या दोन्ही देशांत वाढत्या लोकसंख्येला निवासासाठी जागा अपुरी पडत आहे.

(२) निवासासाठी जागा उपलब्ध व्हावी, यासाठी दोन्ही देशांत मोठ्या प्रमाणावर वनांतील झाडे तोडली जातात.

(३) ब्राझीलमध्ये 'रोका' आणि भारतात 'झूम' यांसारख्या स्थलांतरित शेतीसाठी वनांखाली असलेली जमीन वृक्षतोड करून किंवा जाळून शेतीसाठी व अधिवासासाठी मोकळी केली जाते.

(४) लोकांच्या इंधनाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वनांतील झाडे तोडली जातात.

---

❊ ❊ ❊